# निर्माण

## युवांसाठी शोध व विकासक्रम

तारुण्यात प्रवेश करतांना काही बाबतीत प्रश्न बहुतेकांना पडतात.

- माझं तरुण शरीर, माझं मन आणि गोंधळात पाडणाऱ्या त्यांच्या मागण्या.
- अवतीभवतीची माणसे व त्यांच्याशी माझे वागणे, माझे नाते.
- अवतीभवतीचा समाज, सृष्टी आणि त्यात माझी भूमिका.
- या जगात मी आरोग्य, विकास, जबाबदारी, प्रेम व समाधान यांसह कसे जगावे.

सर्च ही संस्था गेल्या वीस वर्षांहून अधिक काळापासून डॉ. राणी व डॉ. अभय बंग यांच्या नेतृत्वात समाजाचे आरोग्य याबाबत शोध, शिक्षण व सेवेचे कार्य करीत आहे. सर्च तर्फे महाराष्ट्रातील युवक-युवतींसाठी शिबिर, अभ्यास व अनुभव असा दोन वर्षांचा नवीन अुपक्रम सुरु करण्यात आला आहे. याचा अुद्देश्य युवांना खालील गोष्टींसाठी सक्षम होण्याची संधी देणे हा आहे -

- स्वतःचा शोध घेणे.
- समाजाचा शोध घेणे
- स्वतःच्या भूमिकेचा शोध घेणे.
- त्यासाठी स्वतःचा विकास करणे

या अभ्यासक्रमात युवा काय शिकतील **?**

- माझ्या जैविक, भावनिक, सामाजिक व अध्यात्मिक गरजा काय आहेत ? मानवी समाजाच्या गरजा काय आहेत ? सृष्टीच्या गरजा काय आहेत ? या सर्व गरजांचे संतुलन साधण्यासाठी मी कशी जीवनशैली स्विकारायला हवी ?
- माझे अंतरंग कसे आहे ? माझे इतरांशी असलेले नाते प्रेमपूर्ण व सच्चे होण्यासाठी काय करायला हवे ?
- माझ्या वंचित बंधू-भगिनींना त्यांचे जीवन सुखाने, शांतीने, सन्मानाने जगण्याचा अधिकार मिळावा म्हणून मला काय योगदान करता येईल ?
- माझे सामर्थ्य व कुवत कशात आहे ? माझ्यातील कमतरता काय आहेत ? माझ्या जीवनाचे ध्येय काय ? माझे जीवन प्रभावी होण्यासाठी मी काय करायला हवे ? माझे या विश्वातील स्थान व भूमिका काय आहे ?

या शोधासाठी आवश्यक वैज्ञानिक ज्ञान व अभ्यासक या अभ्यासक्रमात मिळवतील. याबरोबरच संवेदनशीलता, संवादकला, अभिव्यक्ति, नेतृत्वगुण, प्रयोगशीलता, चिकीत्सक विचारपध्दती, योग अशी महत्वाची जीवन-कौशल्ये आत्मसात करण्याची संधी त्यांना या अभ्यासक्रमात मिळेल.

या अभ्यासक्रमाचे आगळेपण हे शिकण्याच्या पदधतीत आहे. अनुभव, प्रयोग,शोध, संवाद, निरीक्षणे, स्वाध्याय यातून युवा आपले शिक्षण समृध्द करतील. डॉ. राणी बंग, डॉ. अभय बंग व विवीध विषयांतील अनुभवी तज्ञ व्यक्तींच्या मार्गदर्शनाचा लाभ युवांना या अभ्यासक्रमात मिळेल.